## <u>तक्रार युएलपी नं. १७/२०२२</u>

अर्जदाराने स्वत: प्रकरण चालविणार असल्याचे सांगितले. त्याचा नि. यु–२४ वरील अर्ज मंजूर. सरतपासात कागदपत्रे घेणार नसल्याचे सांगितल्याने प्रकरण उलटतपासाठी.

**<u>उलटतपास सामनेवाले यांचेतर्फे श्री. लगड वकील</u>**.....

हे म्हणणे खरे आहे की घोरपडवाडी ग्रामपंचायतीचे कारभारावर पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचे नियंत्रण असते. हे म्हणणे खरे आहे की पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचेविरुध्द मी मागणी केली नाही. त्यामुळे मी त्यांना प्रतिवादी केले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी घोरपडवाडी ग्रामपंचायतीत पाणीपुरवठा विभागात दि.१.३.२०१९ पासून कार्यरत होतो व दि.३१.३.२०२० रोजी मला कायम करण्यात आले. माझे काम पाणी सोडणे, पाईपलाईनचे देखरेख करणे व वरिष्ठांचे आदेशाचे पालन करणे असे आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे काम अत्यावश्यक सेवेमध्ये मोडते. हे म्हणणे खरे आहे की घोरपडवाडी ग्रामपंचायत येथे पाणी सोडण्यासाठी मी एकच कर्मचारी होतो. हे म्हणणे खरे नाही की दि.१८.९.२०२१ पासून मी कोणत्याही वरिष्ठांची परवानगी न घेता गैरहजर होतो. हे म्हणणे खरे नाही की दि.७.४.२०२२ व १२.४.२०२२ रोजी बनावट अर्ज करुन ग्रामपंचायतीकडे दिले. हे म्हणणे खरे नाही की सदर अर्जावर सरपंचाची मूळ सही नाही. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपचांयतीने दि.२५.४.२०२२ रोजी नोटीस पाठवून गैरहजेरीबाबत खुलासा मागविला होता. व त्युनसार दि.१०.५.२०२२ रोजी खुलासा दिला. दि.१८.७.२०२२ रोजी ग्रामसभेच्या ठराव क्र. ६ नुसार माझा खुलासा अमान्य करण्यात आला याबाबत मला माहित नाही. त्यानंतर ग्रामपंचायतीने दि. १९.७.२०२२

रोजी पुन्हा नोटीस दिली व सबळ पुराव्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार दि. १९.७.२०२२ रोजी ग्रामपंचायतीकडे खुलासा सादर केला. सदरचा खुलासा समाधानकारक नसून न्यायाची संधी दयावी म्हणून दि.१२.८.२०२२ रोजी मला आणखी नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला. व तसा खुलासा दि.१९.८.२०२२ रोजी दिला. हे म्हणणे खरे आहे की दि.७.९.२०२२ रोजी मला बडतर्फ केल्याबाबतचा आदेश रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला. हे म्हणणे खरे आहे की सदर आदेशाविरुध्द मी बी.डी.ओ. राहुरी यांचेकडे दि. ३.१०.२०२२ रोजी अपील केले. व तेथे माझी सुनावणी झाली. हे म्हणणे खरे नाही की मला तेथे सुनावणीची संधी मिळाली. हे म्हणणे खरे आहे की बी.डी.ओ. पंचायत समिती यांनी माझा बडतर्फीचा आदेश अपीलात कायम करण्यात आला. व दि. १९.१२.२०२२ रोजी माझे अपील फेटाळले. हे म्हणणे खरे आहे की माझे अपील फेटाळले खालचा निकाल कायम करण्यात आला.

हे म्हणणे खरे नाही की मी वरिष्ठांचे ऐकत नाही, गावातील लोकांशी उध्दट वागतो व वेळेवर पाणी सोडत नाही अशा तक्रारी माझ्याविरुध्द आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझ्या विनापरवाना गैरहजर राहिल्यामुळे ग्रामपंचायतीला पाणी सोडण्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे शक्य नव्हते. हे म्हणणे खरे नाही की ग्रामपंचायतीने सुधारण्याची संधी देवूनही मी सुधारणा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की अल्का आप्पासाहेब भास्कर यांनी माझ्याविरुध्द फिर्याद दिली होती. परंतु सदरची फिर्याद खोटी आहे. पंचायतीच्या आदेशाविरुध्द मी जिल्हा परिषदेकडे केलेले अपील फेटाळले याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जात पूर्ववत कामावर घेण्याची मागणी मी खोडसाळपणे केली आहे. यामध्ये दिलेले खुलासे मी स्वत: दिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून सेवेत नाही. हे म्हणणे खरे आहे की सुनावणी होवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माझे अपील फेटाळले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तक्रारीत तथ्य असून मी खोटया आशयाचा अर्ज केला

आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी शपथपत्र देवून खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास काही नाही.

सही/—
(शरद जी. देशपांडे)
न्यायाधीश,
प्रथकामगार न्यायालय, अहमदनगर

दि. २३.०१.२०२४